Postal Lic./AMT/RNP/492/2023-2025

वरुड | शनिवार
०७.०६.२०२५

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०६ | अंक: १०८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### कोहलीच्या फॅनचा रक्तरंजीत खेळ, वेडेपणाची हद्द गाठली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***बेंगळुरु*** – इंडियन प्रीमियर लीग मध्ये विजयानंतर सोशल मीडियावर चाहत्यांच्या उत्साहाने भरलेले व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळत आहेत. कोणी भावुक होऊन आनंद व्यक्त करत आहे, तर कोणी फटाके फोडत वेडापिसा झाला आहे. या दरम्यान काही असे व्हिडिओही समोर आले आहेत, ज्यामध्ये चाहत्यांचा अतिउत्साह त्यांच्या जीवावर बेतला. अशाच प्रकारचा प्रसंग विक्ट्री परेडदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत पाहायला मिळाला होता. आता सोशल मीडियावर एक असाच एक धक्कादायक व्हिडीओ व्हायरल होत आहे.

# उद्धव ठाकरेंचा मुलगा पावसाळ्यात जेलची वारी करु शकतो

## आदित्य ठाकरेंच्या अटकेबाबत नितेश राणेंच मोठ विधान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बॉलीवूड अभिनेता डिनो मोरिया सध्या त्यांचा नवीन मल्टीस्टारर चित्रपट 'हाऊसफुल ५' मुळे चर्चेत आहेत. मात्र, त्याचा सिनेमा रिलीज झालेला असतानाच डिनो मोरियाची मिठी नदीच्या घोटाळा प्रकरणात चौकशी सुरु होती. मात्र, आता या प्रकरणात ईडीने एन्ट्री घेतली आहे. तर दुसरीकडे याच मुद्द्यावर बोट ठेवत भाजप नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी शिवसेना नेते आणि आमदार आदित्य ठाकरेंवर सडकून टीका केली आहे.



अभिनेता डिनो मोरिया प्रकरणावरुन नितेश राणेंनी पुन्हा एकदा ठाकरे कुटुंबाला टार्गेट केलंय. उद्धव ठाकरे यांचा मुलगा पावसाळ्यात जेलची वारी करु शकतो, अस म्हणत मंत्री नितेश राणेंनी आदित्य ठाकरे यांच्या अटकेचे संकेत दिलेत. डिनो मोरिया प्रकरणात होणाऱ्या कारवाया आणि एकंदरीत या प्रकरणावरुन लक्ष विचलित करण्यासाठीच एकत्रीकरणाची चर्चा असल्याचही राणे म्हणाले. डिनो मोरिया प्रकरणात उद्धव ठाकरे यांचा मुलगा जेलची वारी करु शकतो, अशी माहिती असल्याचा मोठा दावा नितेश राणेंनी केला. डिनो मोरिया कोणासोबत बसायचा, कोणासोबत भावनिक आणि शारीरिक संबंध आहेत हे सगळ्यांना माहीत असल्याचही त्यांनी सांगितलं. राणे यांच्या आरोपाला आता ठाकरे काय उत्तर देणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. एकाचे २० आमदार, तर एकाचे शून्य आणि आमचे १३२ आम्ही खूप घाबरलोय उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याचा चर्चेची नितेश राणेंनी तुळजापुरात खिल्ली उडवली. आम्हाला झोप लागत नाही, एकाकडे वीस आमदार आणि एकाकडे शून्य यांची एवढी शक्ती आहे. या शक्तीला आम्ही घाबरलो आहोत.

# 'मॅच फिक्सिंग'! बोगस मतदान ते पुरावे लपवणे

## ५ स्टेप सांगत महाराष्ट्राची निवडणूक चोरल्याचा राहुल गांधींचा हल्लाबोल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – लोकसभा विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी २०२४ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचा आरोप करत निवडणूक चोरल्याचा हल्लाबोल केला आहे.

राहुला गांधी यांनी इंडियन एक्स्प्रेसमध्ये पानभर लेखामध्ये पाच ५ स्टेपमध्ये या षड्यंत्राचा आराखडा मांडला आहे. यामध्ये एकतर्फी निवडणूक आयुक्तांची निवड, बनावट मतदार, बनावट मतदान, टार्गेट बुथ रिगिंग आणि पुरावे लपवण्याचे सांगितलं आहे. यामध्ये राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात मतदानानंतर अचानक ७.८३ टक्के मतदान टक्केवारी वाढणे ही इतिहासातील अभूतपूर्व घटना असल्याचे म्हटले आहे. त्यांनी




या सर्व घडामोडींना असल्याचे म्हटले आहे. जिथं निकाल आधीच ठरवले होते. शेवटी, ते म्हणतात की 'मॅच फिक्स झालेली निवडणूक ही लोकशाहीसाठी विष आहे'.

संपूर्ण लोकशाही संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न राहुल गांधी यांनी नोव्हेंबर २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत घोटाळ्याचा आरोप केला आहे. ते म्हणतात की ही फक्त लहान प्रमाणात फसवणूक नाही, तर संपूर्ण लोकशाही संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न आहे. निवडणूक आयुक्तांची नियुक्ती एकतर्फी राहुल गांधी यांनी आपल्या पहिल्या मुद्यात म्हटलं आहे की, २०२३ मध्ये झालेल्या कायद्यामुळे पंतप्रधान आणि गृहमंत्री २:१ बहुमताने निवडणूक आयुक्त नियुक्त करतात.

त्यामुळे या निवड प्रक्रियेत विरोधी पक्षनेत्याच्या मताला फारसे महत्त्व नाही. न्यायाधीशांचाही निर्णय केंद्र सरकारच ठरवतं याकडेही त्यांनी लक्ष वेधलं आहे.

मतदार यादीत बनावट नावे दुसऱ्या मुद्यामध्ये महाराष्ट्रात मतदारयादीत बोगस नावे घुसडल्याचा आरोप केला आहे. यामध्ये आकडेवारी सादर करताना राहुल यांनी मे २०२४ मध्ये महाराष्ट्रातील मतदारसंख्या होती ९०२९ कोटी होती. मात्र, नोव्हेंबर २०२४ मध्ये ती अचानक ९.७० कोटींवर पोहोचली आणि फक्त ६ महिन्यांत ४१ लाखांची वाढ झाल्याचे म्हटले आहे. यातील फक्त १५ लाख मतदारांनी मतदान केले, उर्वरित संशयास्पद असल्याचे म्हटले आहे.

बनावट मतदानाने टक्केवारी वाढवणे राहुल यांनी मतदानाच्या दिवशी ५ वाजता ५८.२२ टक्के मतदान झाले होते असे म्हटले आहे. यामध्ये अंतिम आकडेवारीत ते ६६.०५ टक्के वर गेले. म्हणजे ७.८३ टक्के अचानक वाढ झाल्याचे सांग त्यांनी सुमारे ७६ लाख बनावट मतं घातली गेली असावीत, असा गंभीर आरोप केला आहे.

# अल्पवयीन युवतीचा विनयभंग

## वरुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***वरुड*** – १४ वर्षीय मुलगी घरी परत येत असता आरोपीने मागुन येवुन मुलीला कवट्यात पकडुन तिचा विनयभंग केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ वर्षीय फिर्यादी व आरोपी ईरशाद अहमद शेख (२२), रा.मिर्ची प्लॉट वरुड हे ऐकमेकाचे ओळखीचे असुन एकाच मोहल्यात राहतात. फिर्यादीचे वडील मागील १० वर्षापासुन सोडुन गेल्याने फिर्यादीचे आईने अंकुश गायकवाड यांचेसोबत लग्न केले असुन ते सोबत राहतात. नमुद



घटनावेळी व ठिकानी यातील नमुद १४ वर्षीय फिर्यादी ही शौच वरुन बाहेरुन घरी परत येत असता नमुद आरोपी ईरशाद अहमद शेख याने एकदम मागुन येवुन फिर्यादीस कवट्यात पकडुन तिचा विनयभंग केला. या प्रकरणी १४ वर्षीय फिर्यादी मुलीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी आरोपी ईरशाद अहमद शेख (२२), रा.मिर्ची प्लॉट वरुड याचेविरुद्ध भादंवि ७५ (२), भा.न्या.संहिता २०२३ सह कलम ८, १२ पोक्सो २०१२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

# इकडे ठाकरे बंधूंच्या युतीची चर्चा, तिकडे मनसेचा एकमेव नगरसेवकही फुटला!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – गेल्या काही दिवसांपासून मनसेप्रमुख राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरु असताना मुंबईत मनसेला धक्का बसला आहे. मनसेचे मुंबईतील एकमेव माजी नगरसेवक संजय तुर्डे यांनी मनसे पक्षाला रामराम ठोकला आहे. संजय तुर्डे मुंबईतील कालिना विभागातून निवडून आले होते.

संजय तुर्डे शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची माहिती मिळत आहे.



शिंदेंच्या शिवसेनेकडून संजय तुर्डे यांना आपल्याकडे वळविण्यात यश मिळाले आहे. संजय तुर्डे यांच्यासोबत कलिना परिसरातील मनसेचे पदाधिकारी देखील शिवसेना शिंदे गटात प्रवेश प्रवेश करणार असल्याचं सांगण्यात येत आहे. ठाकरे बंधूंच्या युतीची चर्चा सुरु असताना एकनाथ शिंदेंनी मोठी खेळी खेळल्याचं सध्या राजकीय वर्तुळात चर्चा आहे. कोण आहेत संजय तुर्डे? गेल्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत मनसेचे एकूण सात उमेदवार विजयी होऊन मुंबई महानगरपालिकेत दाखल झाले होते. त्यापैकी माजी नगरसेवक दिलीप लांडे, अश्विनी माटेकर, परमेश्वर कदम, दत्ता नरवणकर, डॉ.अर्चना भालेराव, हर्षला मारे या सहा नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. मात्र संजय तुर्डे यांनी मनसेत कायम राहण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे संजय तुर्डे हे मुंबईतील मनसेचे एकमेव नगरसेवक होते. राज ठाकरेंनी बोलावली बैठक- मनसेशी युती करणार का? या प्रश्नावर उद्धव ठाकरेंनी काल मोठं वक्तव्य केलं. महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल. आता संदेश नाही थेट बातमी देणार, असं शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट सांगितलं. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याचे बोलले जात आहे.

# दुपट्टा ओढून महिलेचा विनयभंग

## आरोपीविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***वरुड*** – ४० वर्षीय फिर्यादी महिला ही तिचे बहिणीसोबत घरी जात असता आरोपीकडुन शिविगाळ होत असल्याने फिर्यादी हिने हटकले असता त्या कारणावरुन आरोपीने फिर्यादीचे छातीवरील दुपट्टा ओढुन तिचा विनयभंग केल्याची घटना घडली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ४० वर्षीय फिर्यादी महिला व आरोपी अंकुश रमेश गायकवाड (३१), रा.मिर्ची प्लॉट वरुड हे ऐकमेकाचे ओळखीचे असुन एकाच मोहल्ल्यात राहतात. नमुद घटना वेळी व ठिकानी यातील नमुद फिर्यादी ही तिचे बहिणीसोबत घरी जात असता नमुद आरोपी अंकुश हा शिविगाळ करीत असता फिर्यादी हिने हटकले. त्या कारणावरुन नमुद आरोपी अंकुश याने फिर्यादीचे छातीवरील दुपट्टा ओढुन विनयभंग केला व लोटालाट करुन या रस्त्याने परत दिसली तर हातपाय तोडण्याची धमकी दिली. या प्रकरणी ४० वर्षीय फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी आरोपी अंकुश रमेश गायकवाड (३१), रा.मिर्ची प्लॉट वरुड याचेविरुद्ध भादंवि ७४, ११५, ३५२, ३५१, (२) (३), भा.न्या.सं.२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहे.

माऊली टाईपरायटींग अँन्ड कॉम्प्युटर इन्स्टीट्युट
Admission Open
Maharashtra Government Authorised Institute
COMPUTER TYPING COURSE
GCC - TBC - SSD
English 30/40/50 -wpm | Marathi 30/40-wpm | Hindi 30/40-wpm
MKCL
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कॉम्प्युटर कोर्स
जिजाऊ नगर, जुन्या शांतीनिकेतन कॉन्व्हेंट जवळ, वरुड

# बनावट देशी दारु साठ्यावर कारवाई : ५१.३२ लाखाचा मुद्देमाल जप्त

(वार्ताहर वरुड दर्पण)

मुंबई - ए. के. इलेक्ट्रीकल्स समोर, मुंब्रा-पनवेल रोड, मुंद्रा, शिळफाटा (ता.जि.ठाणे) येथे बेकायदेशीररित्या बनावट देशी दारुचा साठ्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कोकण विभागीय भरारी पथकाने ५ जून रोजी कारवाई केली. या कारवाईत एकूण ५१ लाख ३२ हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



मुंब्रा-पनवेल रोड, मुंब्रा, शिळफाटा या परिसरातून गोवा राज्यातील बनावट देशी दारुची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाल्यावरुन निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या टीमने सापळा रचत चॉकलेटी रंगाचा आयशर कंपनीच्या क्र.जीजे-०६-बीव्ही-५८२२ या ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात गोवा राज्यातील बनावट देशी दारुचे ९० मिलीचे १२१ बॉक्स व १८० मिलीचे ७२९ बॉक्स जप्त केले.

यामध्ये आरोपी लक्ष्मण सिंह नाथू सिंह राठोड, वय ३७ वर्षे, रा.बस्सी, ता.सलुंबर, जि.उदयपुर (राजस्थान) यास अटक करुन परराज्यातील बनावट देशी दारु वाहतुकीसाठी वापरलेला चॉकलेटी रंगाचा आयशर कंपनीच्या वाहनासह गोवा राज्यातील बनावट देशी दारुचे एकूण ८५० बॉक्स, एक मोबाईल व एका वाहनासह अंदाजे किंमत ५१,३२,९४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ.राजेश देशमुख यांच्या मार्गदर्शनात सह आयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार, ठाणे अधीक्षक प्रविण तांबे यांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आली.

ही कारवाई निरीक्षक दिगंबर शेवाळे, दुय्यम निरीक्षक यादव, रिंकेश दांगट, व्हि. व्हि. सकपाळ, सहा. दुय्यम निरीक्षक महावीर कोळेकर, तसेच जवान श्रीराम राठोड, हनुमंत गाढवे, अमीत सानप, कुणाल तडवी, हर्षल खरबस यांनी यशस्वीरित्या पार पाडली. दुय्यम निरीक्षक एच. बी. यादव हे पुढील तपास करत आहेत.

### रत्नप्रभा बागडे यांच्या वाढदिवसानिमित्त

# प्राथमिक आरोग्य केंद्रात गरजु रुग्णांकरीता औषधी भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड - येथील संदीप बागडे यांच्या आई रत्नप्रभा बागडे यांच्या वाढदिवसानिमित्त गरजु रुग्णांकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र पुसला येथे औषधी भेट देण्यात आली.



गरजु रुग्णांना बाहेरुन जे औषधी आणावी लागते ते बाहेरुन न आणता आपल्याच प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करुन गरजु रुग्णांना काही दिलासा मिळेल, हा हेतु मनात ठेवुन वाढदिवसानिमित्त बाहेर कुठेही इतरत्र कुठेही खर्च न करता ते गरजु रुग्णांसाठी कामी लागले तर खऱ्या अर्थाने सामाजिक कार्यात आपण काहीतरी योगदान केल्याचे समाधान होईल, हा हेतु मनात ठेवुन एक सामाजिक बांधिलकी जोपासत हे कार्य संदीप बागडे यांनी आईच्या वाढदिवसानिमित्त केले. यावेळी प्रामुख्याने आशीष श्रीराव, अनिल पाटणकर, डॉ.वैभव राऊत, कैलास बरगट, प्रविण कराळे, सुरज धर्मे, गजानन नानोटकर, राजेंद्र पाटील, उमेश सिरसाम, कैलास बागडे, रवी वाहने, राजेश गजभिये, भारती, प्रिया, शालिनी बागडे, वैशाली पाटील, प्रदीप बीबे, निकेश डहाके, संदीप बागडे, गणपती नारनवरे, दिव्या ठवरे, देवेंद्र डहाके, ताहीर शेख, संजय बमनोटे, प्रमोद पाटणकर, नितिन सावले, योगेश विंचुरकर, आनंद पाटील, दिपक काळे, निलेश भागवतकर, प्राथमिक आरोग्य केंद्र पुसला मधील सर्व कर्मचारी वृंद व आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

# एन्काउंटर झालेल्या आरोपीनेच पहिली गोळी झाडली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

छ.संभाजीनगर - छत्रपती संभाजीनगरच्या वाळूजमधील उद्योजक संतोष लड्डा यांच्या निवासस्थानी काही दिवसांपूर्वी मोठा दरोडा पडला होता.

आता या प्रकरणात एक अत्यंत महत्त्वाचा खुलासा झाला आहे. एन्काउंटरमध्ये ठार झालेल्या मुख्य आरोपी अमोल खोतकरनेच पोलिसांवर पहिली गोळी झाडल्याचा जबाब त्याच्या मैत्रीणीने दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

# शासकीय कार्यालयातील ई-सेवा केंद्रांमध्ये स्टॅम्प पेपरची मागणी बेकायदेशीर

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे काय म्हणाले?**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई - शासकीय कार्यालयातील ई-सेवा केंद्रातून विविध शैक्षणिक दाखले, तसेच न्यायालयातील प्रतिज्ञापत्रासाठी केली जाणारी शंभर आणि पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरची मागणी बेकायदेशीर असल्याचा आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जारी केला आहे. ई-सेवा केंद्रांमध्ये स्टॅम्प पेपरची मागणी कोणत्याही स्थितीत करु नये, असा स्पष्ट आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना दिला आहे.



विद्यार्थी, पालक, पक्षकार तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी दोन महिन्यांपूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच न्यायालयासमोर दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅम्प पेपर रद्द करण्यात आले आहेत, अशीही माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. दरम्यान या प्रकरणाच्या तक्रारींची गंभीर दखल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी यांनी घेतली असून नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील अधिकाऱ्यांना त्या संदर्भात निर्देश दिले आहेत. शेतकरी व नागरिकांची फसवणूक होणार नाही, याची काळजी घ्या. शिवाय दोषींवर अधिकाऱ्यांनी ७ दिवसांत गुन्हा दाखल करावा अशा सूचना ही बावनकुळे यांनी दिल्या आहेत.

# वाराणसीतून मोदींचा जवळजवळ पराभव झाला होता, दिल्लीतून यंत्रणा हलली, दोन तास गोंधळ घालत मतमोजणी हायजॅक केली : संजय राऊतांचा सनसनाटी दावा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

संभाजीनगर - काँग्रेसचे नेते व लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत भाजपवर निवडणूक चोरीचा गंभीर आरोप केला आहे.

राहुल गांधींनी ‘इंडियन एक्सप्रेस’मधील लेखातून पाच टप्प्यांमध्ये संपूर्ण यंत्रणेचा आराखडा मांडला आहे. यात निवडणूक आयुक्तांची एकतर्फी निवड, बनावट मतदारांची नोंदणी, खोटं मतदान, टार्गेट बुथ रिगिंगसह फुटेज व इतर महत्त्वाचे पुरावे लपवण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले आहे. आता यावरुन शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सनसनाटी दावा करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपवर हल्लाबोल केलाय.



संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्राची विधानसभेची निवडणूक ही अमित शाह यांनी त्यांची स्वत:ची निवडणूक किंवा प्रत्यक्ष मोदींची निवडणूक आहे, अशा पद्धतीने ते लढले. आपल्या लक्षात आले असेल की, वाराणसी लोकसभेच्या निवडणुकीत सुरुवातीचे दोन तास मोदी हे पिछाडीवर होते. त्यानंतर मतमोजणी थांबविण्यात आली आणि मतमोजणी केंद्रावरील लाईट घालवण्यात आली.

त्याचा परिणाम ईव्हीएम मशीनवर झाला. डाटा उडाला आणि नवीन मशीन आणण्यात आल्या. दिल्लीतून यंत्रणा हलली. वाराणसीतून मोदींचा जवळजवळ पराभव झाला होता. दोन तास या लोकांनी गोंधळ घातला, मतमोजणी हायजॅक केली.

राहुल गांधी यांनी हा प्रश्न आंतरराष्ट्रीय मंचावर नेला. संजय राऊत पुढे म्हणाले की, तोच प्रकार महाराष्ट्रात झाला. राहुल गांधी आणि आम्ही सगळे म्हणतो त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या निवडणुकीचा विजय चोरलेला आहे, हायजॅक केलेला आहे. निवडणूक यंत्रणा ताब्यात घेतली.

निवडणूक आयुक्त ताब्यात घेतले. ईव्हीएम मशीनची तर समस्या आहेच. शेवटच्या दोन तासात ६० ते ६५ लाख मतदान अचानक वाढविण्यात आले. राहुल गांधी यांनी हा प्रश्न आंतरराष्ट्रीय मंचावर नेला. त्यामुळे हिंदुस्तानची लोकशाही किती खतरनाक वळणावर आहे हे जगाला कळले.

जगात नरेंद्र मोदी आणि आपल्या सरकारला अपमान सहन करावा लागतोय. हे लोक लोकशाही मानत नाहीत, हे लोक हुकूमशाही प्रवृत्तीने काम करतात. हे लोक निष्पक्ष निवडणूक करत नाहीत. जगात नरेंद्र मोदी आणि देशाची प्रतिष्ठा धुळीला मिळाली आहे, असा हल्लाबोल देखील त्यांनी केला.

### राष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धेत

# प्रथमेश मानकरला रौप्य पदक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड - वरुड असोशिएशन ड्रिम तायक्वांडो ॲकडमीचा खेळाडु प्रथमेश मानकर याने उत्तराखंड स्पर्धेत रोप्य पदक पटकाविले आहे. त्याने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करुन यश संपादन केले. आगामी एशीयन युथ गेमसाठी प्रथमेश भारतीय संघात नाव निश्चित होण्याची सर्वांच्या अपेक्षा आहे. इंडिया तायक्वांडो या देशातील एकमेव अधिकृत राष्ट्रीय संघटनेच्या वतीने उत्तराखंड येथे २५ मे ते १ जून दरम्यान राष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धा पार पडली. प्रथमेश आपल्या यशाचे श्रेय आई, वडिल, तायक्वांडो असोशिएशनचे अध्यक्ष लोकेश अग्रवाल, उपाध्यक्ष शशिकांत यावलकर व सचिव प्रा.किशोर तडस यांना देतो.



# कुंभार्ली घाटात संरक्षण भिंत कोसळली, रेलिंगही निखळलं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

चिपळूण - राज्यभरात जोरदार पावसाला सुरुवात झाली असून कोकणपट्टयात पावसाने जीवनमान विस्कळीत झाले आहे. चिपळूण-कराड मार्गावरील कुंभार्ली घाटात शनिवारी पहाटेच संरक्षक भिंत कोसळल्याने रस्ता खचण्याची भीती निर्माण झाली आहे. खोल दरीच्या काठावर असलेली भिंत कोसळून रेलिंग सुद्धा निखळलेली दिसते. हजारो अवजड वाहनं दररोज या मार्गावरुन जातात;



मात्र प्रशासनाकडून फक्त दगड लावून तात्पुरती उपाययोजना करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना अपघाताचा धोका निर्माण झालाय. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा रस्ता खचल्यास घाटातील वाहतूक बंद होण्याची भीती निर्माण झालीय. कुंभार्ली घाटात संरक्षक भिंत कोसळली कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या कुंभार्ली घाटात अचानक संरक्षक भिंत कोसळली असून रेलिंगही निखळलीय. घाटात खोल दरीच्या बाजूने असलेली ही भिंत कोसळली. यामुळे त्या ठिकाणी रस्ता खचण्याचा धोका निर्माण झाला आहे. एवढंच नाही तर या भागातील लोखंडी रेलिंगही तुटलं असून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. घटनास्थळी प्रशासनाकडून सध्या फक्त दगड लावून तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. या उपाययोजना अपुऱ्या असून मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पशुवैद्यकीय दवाखान्याला ताला ठोकणार

### पुसलाच्या युवा मित्र मंडळ पदाधिकाऱ्यांचा इशारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड - पुसला येथे कायमस्वरुपी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणुक करा, अन्यथा दवाखान्याला ताला ठोकण्यात येईल, असा ईशारा युवा मित्र मंडळ पुसलाच्या वतीने पंचायत समिती गटविकास अधिकारी व तालुका पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, पुसला हे मोठ्या संख्येचे गाव असून त्याच्या आजुबाजुला भरपूर गाव खेडे लागुन आहे. या भागामध्ये शेतकरी वर्ग असल्यामुळे भरपूर प्रमाणात गाई, म्हैस, बकरी, बैल, कुत्रे पाळले जाते परंतु काही वर्षापासून पुसला येथील शासकीय पशु दवाखान्यामध्ये कायमस्वरुपी पशुवैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या पशुची गैरसोय होत आहे आणि खाजगी पशु डॉक्टरांकडे गेले असता शेतकऱ्यांना आर्थीक भूर्दंड सोसावा लागतो. तेव्हा येत्या १० ते १५ दिवसामध्ये पुसला येथे कायमस्वरुपी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणुक करावी, अन्यथा येत्या ९ जूनला सकाळी ११ वाजता पुसला येथील दवाखान्याला ताला ठोकण्यात येईल, असा ईशारा युवा मित्र मंडळ पुसला अध्यक्ष सुरज धर्मे, उपाध्यक्ष जावेद शेख, सचिव प्रद्युम्न तवले, कमलेश खपरीये, अनिकेत कारणकर आर्दींनी दिला आहे.

## संपादकीय

### गुणांचं कौतुक उशीरा होतं; पण होतं

# समृध्दी महामार्ग

राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूर यांना अधिक जवळ आणणाऱ्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गा'चे बहुप्रतीक्षित स्वप्न अखेर पूर्ण झाले. अडीच दशकांपूर्वी पुणे-मुंबई द्रुतगती मार्गापासून रस्त्यांबाबत राज्यात सुरु झालेल्या प्रवासातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. वाहतुकीची साधने आणि विकास यांचे नाते पूर्वीपासून असले, तरी महाराष्ट्रात याची चाहूल अंमळ उशिराच लागली. राज्यस्थापनेनंतर पहिल्या काही दशकांमध्ये शेती आणि ग्रामीण विकास यांवर राज्याचा भर राहिला. मात्र, काळाच्या ओघात शेतीला वाढत्या लोकसंख्येचा भार पेलवेनासा होऊ लागला. शेतीतील उत्पन्न-रोजगार आक्रसू लागले आणि अन्य क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मितीशिवाय विकास नाही, हे वास्तव समोर आले. त्याच काळात खुल्या अर्थव्यवस्थेमुळे उत्पादन-सेवा क्षेत्रांमध्ये शिक्षण आणि रोजगाराची कवाडे उघडली आणि महाराष्ट्रातही मुंबई-पुण्याच्या पलीकडे विकासाच्या केंद्रांचा विस्तार होऊ लागला. याच काळात तेव्हाचे महाराष्ट्रातील मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने देशातील पहिलावाहिला द्रुतगती महामार्ग उभा राहिला; त्यातून या पट्ट्याने औद्योगिकीकरण आणि शहरीकरणातून होणाऱ्या विकासाचे नवे मॉडेल राज्याला दाखवले. महाराष्ट्राच्या दोन्ही टोकांना जोडणारा समृद्धी महामार्ग हे याच विकासयात्रेतील नवे वळण मानले पाहिजे. ठाण्यापासून ते नाशिक, विदर्भ आणि मराठवाड्यातील दहा जिल्ह्यांमधून जाणाऱ्या आणि २४ जिल्ह्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ मिळवून देणाऱ्या ७०१ किलोमीटर लांबीच्या या महामार्गाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. या महामार्गामुळे नाशिकबरोबरच विदर्भ-मराठवाड्याच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे. हा मार्ग भविष्यात वाढवण बंदराला जोडण्याची घोषणा झाली आहे. त्यामुळे या सर्व भागातील शेतीमालासाठी मुंबईसह जागतिक बाजारपेठही खुली होईल. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी ग्रासलेल्या विदर्भ-मराठवाड्यातील अविकसित भागाकडे यामुळे आर्थिक ओघ वळू शकतो आणि 'मिहान'सारख्या केंद्रांमधील उत्पादनांचे वितरण सुलभ होऊ शकते. त्याबरोबरच धार्मिक यात्रा आणि पर्यटन यांतून अनेक गावे-शहरांचा चेहरामोहरा पालटण्याची क्षमता अशा प्रकल्पांमध्ये आहे. या प्रकल्पाचा आजवरचा प्रवास मुळीच सोपा नव्हता. भूसंपादनापासून ते राजकीय विरोध, आर्थिक अडचणी आणि तांत्रिक आव्हानांचे अनेक काटे या मार्गावर पसरलेले होते; मात्र राजकीय इच्छाशक्तीच्या बळावर त्यातून वाट काढत हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार या त्रयीसह अभियंते-तंत्रज्ञांपासून सर्वसामान्य कामगारांनाही दिले पाहिजे. या प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर शक्तिपीठ महामार्गाला गती देण्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली आहे. त्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमधून होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या विरोधातून मार्ग काढावा लागेल. समृद्धी महामार्गाचा खर्च तब्बल ६१ हजार कोटी रुपयांवर, म्हणजे नियोजित खर्चापेक्षा प्रचंड वाढला आहे. भूसंपादनाचे नवे नियम आणि कालापव्ययासह अन्य आर्थिक कारणे त्यामागे असली, तरीसुद्धा हा वाढता खर्च ही अर्थकारणाच्या दृष्टीने चिंतेची बाब ठरते. 'समृद्धी'च्या फुगलेल्या खर्चाबाबत आरोप करून काँग्रेसने श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली आहे. नुकताच घोडबंदर ते भाईंदर मार्गाचा खर्च तीन हजार कोटी रुपयांनी वाढल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने कानउघाडणी केली आहे, तसेच पुण्याच्या रिंग रोडसाठीही अव्वाच्या सव्वा खर्चाची उड्डाणे झाल्याचे आरोप होत आहेत. त्यामुळे सरकारने योग्य आर्थिक ताळमेळ बसवून खर्चाच्या 'गळती'ला आणि मलिद्यावर डोळा ठेवणाऱ्यांना चाप लावला पाहिजे. या वाढत्या खर्चाच्या भरपाईसाठी टोलचा भुर्दंड दिवसेंदिवस वाढत असल्याने वाढत्या जनरोषाची दखल सरकारला घ्यावीच लागेल. दुसरीकडे 'मुंबई ते नागपूर आठ तासांत' अशा प्रकारच्या घोषणांमधून वाहनांचा वेग भयप्रद पद्धतीने वाढला असून, प्राणघातक अपघातांचे प्रकार वारंवार घडत आहेत. त्याबाबत खबरदारीचे योग्य उपाय आणि वाहनचालकांना प्रशिक्षण-प्रबोधनाचीही व्यवस्था केली पाहिजे. काही दिवसांपूर्वी या महामार्गाच्या पूर्वीच्या टप्प्यांवर रस्त्यावर खड्डे-तडे पडल्याचे समोर आले. प्रचंड वेगाने जाणाऱ्या वाहनांसाठी ते अपघातांना निमंत्रण ठरु शकते, त्यामुळेच या मार्गाच्या देखभाल-दुरुस्तीकडेही लक्ष द्यावे लागेल.

## सुविचार

*"जर तुम्ही तुमचे स्वप्न साकारत नसाल तर तुम्हाला दुसरे कोणी तरी त्यांचे स्वप्न साकार करण्यास कामला ठेवेल."*

# दरकपातीचा सुखद धक्का



चालू आर्थिक वर्षासाठी पतधोरणाच्या द्वैमासिक आढाव्यात रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी रेपो दरात अर्धा टक्का कपात केली. त्याचबरोबर रोखीचे राखीव प्रमाणही (सीआरआर) एक टक्का कमी केले. बँकांसह अर्थव्यवस्थेतील विविध घटक रेपो दरात रिझर्व्ह बँकेने कपात करावी, ही मागणी सातत्याने करत होते. नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी त्याला सकारात्मक प्रतिसादही दिला होता. आधीच्या पतधोरण आढाव्यात त्यांनी रेपो दर पाव टक्का खाली आणला होता.

रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला, ९ एप्रिल रोजी सादर केलेल्या पतधोरणात रेपो दरात पाव टक्का कपात करून तो ६.२५ टक्क्यांवरून सहा टक्क्यांवर आणला होता. त्या वेळी संजय मल्होत्रा यांनी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून नुकताच पदभार स्वीकारला होता. नव्या गव्हर्नरांची छाप पडावी म्हणून कदाचित रेपो दरात पाव टक्के कपात केली असावी, असे त्या वेळी बँकिंग व औद्योगिक जगताला वाटले. त्यानंतरच्या दोन महिन्यांत रशिया-युक्रेन युद्ध अधिकच भडकले, अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका फर्स्टचा नारा देऊन व्यापारयुद्ध छेडले. यावर कळस झाला तो पहलगाम येथे झालेल्या अतिरेक्यांच्या क्रुर हल्ल्याने आणि त्यानंतरच्या भारताच्या कारवाईने. या पार्श्वभूमीवर, जगभरात निर्माण झालेल्या अनिश्चिततेचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ न देण्याची जबाबदारी घेत, रिझर्व्ह बँकेने रेपो दरात अर्धा टक्का कपात केली. त्याचबरोबर सीआरआरही घटवला. रेपो दरात कपात केल्यामुळे आता बँकांना रिझर्व्ह बँकेकडून कमी दरात पैसा उपलब्ध होईल. सीआरआर कमी केल्यामुळे बँकांना सुमारे २.५ लाख कोटी रुपये उपलब्ध होतील. बँकांकडून कमी केला गेलेला कर्जपुरवठा हा चिंतेचा विषय झाला होता. आजच्या निर्णयामुळे बँका अधिक प्रमाणात कर्जे देऊ शकतील. ही कर्जे स्वस्त दरातही उपलब्ध होतील, ज्याचा थेट फायदा गृह क्षेत्राला होईल. घरांच्या मागणीत यामुळे वाढ होण्याचीही शक्यता आहे. सर्वसाधारणपणे रेपो दरात कपात केली की, बँका कर्जे स्वस्त करतात. पण त्याचवेळी हमखास मुदतठेवींवरील व्याजदरही घटवले जातात. यावेळी रेपो आणि सीआरआर हे दोन दर खाली आणल्यामुळे बँकांना कर्जे स्वस्त करण्याबरोबरच ठेवींचे व्याजदर पूर्वीइतकेच राखणे शक्य होईल. दरवाढीमुळे सध्या आनंदाचे वातावरण निर्माण झालेले असले, तरी पतधोरणाच्या पुढील आढाव्यात पुन्हा दरकपात होण्याची शक्यता कमी असल्याचे सूतोवाच करण्यास गव्हर्नर विसरलेले नाहीत, हेही लक्षात घ्यायला हवे.

# चर्तु:सूत्र : न्यायालयांचा धाक निवडणुकीतही गरजेचा!

घटनात्मक आणि स्वायत्त असलेल्या निवडणूक आयोगाच्या निर्णयांत हस्तक्षेप न करण्याची कायदेशीर परंपरा आजतागायत आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक निकालांतून वेळोवेळी ते अधोरेखित केले आहे. संविधानातील पंधराव्या भागात अनुच्छेद ३२४ ते ३२९ निवडणूक आयोगाचे अधिकार विशद करणारे आहेत.

अनुच्छेद ३२९ अंतर्गत मतदारसंघ आखणीला आव्हान देता येत नाही, तसेच विधानसभा वा लोकसभा निवडणूकअंतर्गत तंट्याची दाद आधी आयोगाकडेच मागावी लागते. याहूनही गंभीर प्रकरणांची संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने न्यायालयांनी दखल घेतल्याचा इतिहास आहे. निवडणूक आयोगाला सर्वाधिक स्वातंर्त्य दिले गेल्याचे आजवरचे न्यायालयीन निकाल स्पष्ट करतात. सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद ३२ अथवा उच्च न्यायालयांनी अनुच्छेद २२६ अंतर्गत निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नेहमीच नकार दिला आहे. निवडणूक निकालांना



न्यायालयात आव्हान देण्याचा म्हणजे निवडणूक याचिकेचाच एकमेव कायदेशीर पर्याय लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार उपलब्ध आहे.

चंडीगड महापौर पदाच्या निवडणुकीतील गैरकारभाराची न्यायालयाने अनुच्छेद ३२ अंतर्गत दखल घेतल्याने तात्काळ न्याय होऊ शकला. पण दुसरीकडे २०१९ साली अरुणाचल प्रदेशातील करिखो क्री यांच्या निवडणूक निकालाच्या वैधतेवरील याचिकेचा अंतिम निकाल येण्यास पाच वर्षे लागली. या याचिकेने इंदिरा गांधींचे आसन डळमळीत केल्याचा इतिहास असला तरी, एकंदरीत निवडणूक याचिकेची प्रक्रिया बहुतांशी संथ आणि दीर्घकाळ चालणारी असते. मग ती १९५२ सालची पोन्नुस्वामी याचिका असो अथवा २०२४ सालचे रश्मी बर्वे प्रकरण! नुकतेच सर्वोच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन न्यायपीठाने फॉर्म १७ सी बाबत हस्तक्षेप न करण्याचीच भूमिका कायम ठेवली. मग निवडणुकीच्या पश्चात आकडेवारीत तफावत आढळली, तर सर्वोच्च न्यायालय त्याची दखल घेईल? अथवा लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यास सांगेल? निवडणूक याचिकांचा पर्याय निवडण्यास सांगितल्यास ती प्रकरणे व्यापक सांविधानिक कक्षेतून बाहेर होत मर्यादित कायदेशीर कक्षेत समाविष्ट होतील. अर्थात या जरतरच्या प्रश्नांची उत्तरे वेळ आल्यावर स्पष्ट होतीलच. पण न्यायालयाच्या संयमाची आधीची उदाहरणे पाहू.

**एन. पी. पोन्नुस्वामी वि. निवडणूक अधिकारी ( १९५२ )**

एन. पी. पोन्नुस्वामी विरुद्ध निवडणूक अधिकारी प्रकरणात याचिकाकर्ते पोन्नुस्वामी यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्याच्या निर्णयास मद्रास उच्च न्यायालयात अनुच्छेद २२६ अंतर्गत आव्हान दिले.

त्यात हस्तक्षेप करण्यास नकार देताना उच्च न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद ३२९ तरतुदीनुसार आयोगाकडेच दाद मागा, असे सुनावून याचिका फेटाळली. त्याविरोधात पोन्नुस्वामी यांनी अनुच्छेद १३२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सरन्यायाधीश पतंजली शास्त्री, न्या. फझल अली, न्या. मेहेरचंद महाजन, न्या. बी. के. मुखर्जी आणि न्या. एन. चंद्रशेखर अय्यर यांच्या पाच सदस्यीय पीठाने २१ जानेवारी १९५२ रोजी उच्च न्यायालयाचा निकाल योग्य असल्याचे सांगत पोन्नुस्वामींचे आव्हान फेटाळले. अनुच्छेद ३२९ नुसार लोकसभा अथवा विधानसभेच्या निवडणुकीस कुठल्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

# सोसणे-सोकावणे

लोगातील बहुतांश मध्यवर्ती बँका तोट्यात असताना भारताची मध्यवर्ती रिझर्व्ह बँक आपल्या मालकास, म्हणजे केंद्र सरकारला, दोन लाख कोटी रुपयांहून अधिक लाभांश देते यातून रिझर्व्ह बँकेची नफा कमावण्याची क्षमता तसेच केंद्र सरकारची गरज या दोन्हींचे दर्शन होते. रिझर्व्ह बँकेचा हा विक्रमी लाभांश. त्यासाठी बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांचे अभिनंदन करावे तितके थोडे. आपल्या पालकांस अधिकाधिक कमावून देणे हे कोणत्याही पाल्याचे कर्तव्यच असते. ते चोख पार पाडत असल्याबद्दल दास यांचे अभिनंदन. त्यांच्या काळात केंद्राची विक्रमी कमाई झाली. व्यक्ती असो वा व्यवस्था. अनपेक्षित धनलाभ हा सर्वांनाच आनंददायी असतो. केंद्र सरकारला सध्या हा आनंद घेता येत असेल. कारण आपणास एक लाख कोटी रुपये मिळतील अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात रिझर्व्ह बँकेने अपेक्षित रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक निधी केंद्राच्या झोळीत घातला. विद्यमान सरकारच्या काळात रिझर्व्ह बँकेने पालक सरकारला किती किती निधी दिला, हे पाहणे उद्बोधक ठरावे. या रकमेत कधी, कशी वाढ झाली हेही यावरून कळेल. विद्यमान सरकार सत्तेवर आल्यानंतर एकाच वर्षात ६५,८९६ कोटी रु. (२०१५), ६५,८७५ कोटी रु. (२०१६), ३०,६५९ कोटी रु. (२०१७), ५० हजार कोटी रु. (२०१८), एक लाख ७५ हजार ९८८ कोटी रु. (२०१९), ५७,१२८ कोटी रु. (२०२०), ९९,१२२ कोटी रु. (२०२१), ३०,३०७ कोटी रु. (२०२२), ८७,४१६ कोटी रु. (२०२३) आणि यंदा थेट दोन लाख १० हजार ८७४ कोटी रु. म्हणजे गेल्या अवघ्या नऊ वर्षांत एकट्या रिझर्व्ह बँकेने केंद्रास आठ कोटी ७३ लाख २६६ कोटी रु. इतका लाभांश दिला. वास्तविक केंद्रास पैसा पुरवठा करणे हे काही रिझर्व्ह बँकेचे कर्तव्य नाही. पण तरीही असा निधी रिझर्व्ह बँकेकडून केंद्रास दिला जातो. तो मुळात दिला जावा का आणि द्यावयाचा असेल तर किती, हा यातील कळीचा मुद्दा आहे आणि त्यावर अर्थतज्ज्ञांचे एकमत नाही. हा निधी म्हणजे रिझर्व्ह बँकेने देशातील सरकारी बँकांसाठी राखलेला 'संकटकाळी बाहेर जाण्याचा मार्ग' असतो. त्यावर सरकारी मालकी असते हे खरे असले तरी तो देशातील



बँकांसाठी आणीबाणीच्या परिस्थितीत हाताळण्यासाठी ठेवलेला असतो. गातील बहुतांश मध्यवर्ती बँका तोट्यात असताना भारताची मध्यवर्ती रिझर्व्ह बँक आपल्या मालकास, म्हणजे केंद्र सरकारला, दोन लाख कोटी रुपयांहून अधिक लाभांश देते यातून रिझर्व्ह बँकेची नफा कमावण्याची क्षमता तसेच केंद्र सरकारची गरज या दोन्हींचे दर्शन होते. रिझर्व्ह बँकेचा हा विक्रमी लाभांश. रिझर्व्ह बँकेचा हा विक्रमी लाभांश. त्यासाठी बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांचे अभिनंदन करावे तितके थोडे. आपल्या पालकांस अधिकाधिक कमावून देणे हे कोणत्याही पाल्याचे कर्तव्यच असते. ते चोख पार पाडत असल्याबद्दल दास यांचे अभिनंदन. त्यांच्या काळात केंद्राची विक्रमी कमाई झाली.

व्यक्ती असो वा व्यवस्था. अनपेक्षित धनलाभ हा सर्वांनाच आनंददायी असतो. केंद्र सरकारला सध्या हा आनंद घेता येत असेल. कारण आपणास एक लाख कोटी रुपये मिळतील अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात रिझर्व्ह बँकेने अपेक्षित रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक निधी केंद्राच्या झोळीत घातला. विद्यमान सरकारच्या काळात रिझर्व्ह बँकेने पालक सरकारला किती किती निधी दिला, हे पाहणे उद्बोधक ठरावे. या रकमेत कधी, कशी वाढ झाली हेही यावरून कळेल.

वरुड दर्पण हे दैनिक पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून दैनिक वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# राज्यस्तरीय कविता, लेख, कथा स्पर्धेचे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*अलीबाग* – सावली डिजिटल न्युज पोर्टल व सावली प्रकाशन तर्फे निघणाऱ्या तिसऱ्या सावली दिवाळी अंकासाठी राज्यस्तरीय कविता, कथा, लेख स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी कविता २० ओळींची, कथा व लेख ६०० ते ८०० शब्दात असावेत स्पर्धेसाठी कोणत्याही विषयावर लेखन करावे फक्त ती रचना अप्रकाशीत असावी तसे नमूद करणे आवश्यक आहे. कवितेसाठी प्रथम क्रमांक २१०० रूपये, द्वितीय क्रमांक १५०० रुपये व तृतीय क्रमांक ११००, लेख व कथा स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक २५०० रुपये, द्वितीय क्रमांक २००० रुपये, तृतीय क्रमांक १००० रुपये यासोबत विजेत्यांना सन्मानचिन्ह व सहभाग सन्मानपत्र दिले जाईल. सहभागी स्पर्धकाना यासाठी ५५१ रुपये नोंदणी शुल्क आकारले जाईल यामध्ये स्पर्धकाला सावली दिवाळी अंकाची एक प्रत व सन्मानचिन्ह घरपोच करण्यात येईल. स्पर्धेसाठी आपले साहित्य संपादक सचिन पाटील यांना ९२०९५७९३३५ या क्रमांकावर लवकर पाठवावे असे आवाहन करण्यात आले आहे या स्पर्धेसाठी खूप छान प्रतिसाद मिळत आहे तरी सर्वांनी सहभागी व्हावे.



**वरुड :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्य पुसला वर्तुळ मधील धनोडी येथे वृक्ष लागवड करण्यात आली. या कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन राऊत, सहाय्यक पुसला वर्तुळ पी.एस.उईके, ए.ए.हागोने, दिलीप भोयर, सरपंच संजय आडे, मुख्याध्यापक शिवशंकर गोरले, विशाल देवळे व इतर गावातील नागरिक्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# राज्यात अत्याधुनिक सुविधांसह क्रीडा संकुले उभारावीत : क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*मुंबई* – राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी अत्याधुनिक सुविधांसह तालुका व जिल्हा क्रीडा संकुले उभारणीची कामे करावीत, असे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.



मंत्रालयात क्रीडा व युवक कल्याण मंत्री भरणे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे राज्य क्रीडा विकास समितीची बैठक झाली. यावेळी राज्याच्या क्रीडा धोरणांतर्गत, क्रीडा योजनांमध्ये सुधारणा करणे, नवीन धोरणांमध्ये अभिप्रेत असलेल्या योजनांना मान्यता देणे, विभागाच्या क्रीडा सुविधा हाती घेणे तसेच क्रीडा योजनांच्या अंमल बजावणीबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी क्रीडा विभागाचे प्रभारी आयुक्त सुधीर मोरे, उपसचिव सुनील पांढरे यांच्यासह महसूल, वित्त, सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते. क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात ३८० तालुक्यात ४२५ क्रीडा संकुलास मान्यता असून, पूर्ण झालेल्या १६२ क्रीडा संकुंलात जास्तीत जास्त खेळाडूंना सुविधा मिळावी यासाठी प्रयत्न करावेत.

# जागतिक अन्न सुरक्षा दिनानिमित्त मुंबईत आज राज्यस्तरीय कार्यक्रम

**अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*मुंबई* – जागतिक अन्न सुरक्षा दिन दरवर्षी ७ जून रोजी साजरा केला जातो. या दिनानिमित्त राज्याचा मुख्य कार्यक्रम ७ जून २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.



या कार्यक्रमात अन्न सुरक्षा : कृती विज्ञान या संकल्पनेवर आधारित विविध सत्रे, माध्यमांद्वारे जनजागृती, तज्ज्ञांचे विचार, आणि राज्यातील अन्न सुरक्षा संबंधित उपक्रमांचा आढावा घेतला जाणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले.

जागतिक अन्न सुरक्षा दिनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे होत असलेला कार्यक्रम व पंढरपूर आषाढी वारी मध्ये अन्न व औषध प्रशासना मार्फत राबविण्यात येणारे उपक्रम या निमित्ताने मंत्री झिरवाळ यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रे जागतिक अन्न सुरक्षा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात १८९ अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रे दिली जाणार आहेत. अन्न प्रशासन विभागात इतक्या मोठ्या प्रमाणावर नियुक्त्या प्रथमच झाल्या आहेत. अन्न व औषध प्रशासनात नव्याने रुजू होणाऱ्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांमुळे अन्न व औषध प्रशासन विभागाचे काम अधिक सक्षम व गतीने होणार असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी यावेळी सांगितले.

पंढरपूर आषाढी वारी मार्गावर विशेष सेवा पंढरपूर आषाढी वारीच्या अनुषंगाने वारी मार्गावर अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने विशेष सेवा देण्यात येणार आहे. वारी मार्गावर औषधांचा पुरवठा योग्य प्रमाणात होण्यासाठी आरोग्य विभाग व औषध पुरवठादार यांचेमध्ये समन्वय ठेवण्यात येत आहे.

वारी मार्गावर असणाऱ्या अन्न छत्रांमध्ये स्वच्छ व निर्भेळ अन्न मिळेल याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वारी मार्गावर मुक्कामाच्या ठिकाणी होणाऱ्या कीर्तनामध्ये अन्न सुरक्षा जनजागृतीसाठी कीर्तनकारांनी प्रबोधन करावे असे आवाहन त्यांना करण्यात येणार आहे. याबरोबरच आषाढी वारी मार्गावर अन्न सुरक्षा वाहन ठेवण्यात येणार असल्याची माहिती मंत्री झिरवाळ यांनी दिली.

# राज्यभरातील 'आयटीआय' संस्थांमध्ये शिवराज्याभिषेक दिनी राष्ट्रहितावर व्याख्यानमालेद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*मुंबई* – कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत राज्यभरातील १०९७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) 'पंचपरिवर्तन' संकल्पनेवर आधारित व्याख्यानमालेची सुरुवात झाली.





या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, इतिहासाची जाणीव आणि जबाबदार नागरिकत्वाचे मूल्य रुजवणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. सोलापूर येथील जिल्हा व्यवसाय शिक्षण कार्यालय व महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे 'पंचपरिवर्तन' व्याख्यानमाला उदघाटन कार्यक्रमास मंत्री लोढा उपस्थित होते. मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, सर्वत्र छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन सोहळा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केला जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी लोककल्याणकारी आदर्शवत अशी राज्यकारभार पद्धत राबवली. त्याच पद्धतीच्या अवलंब करुन आपले राज्य शासनही राज्यकारभार करत आहे. समाजातील प्रत्येक विद्यार्थी, नागरिक व पालक यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा व आदर्शांचा आपल्या जीवनात अंगीकार करावा. शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोकरी किंवा उद्योग या दोन्ही पर्यायाचा विचार केला पाहिजे. स्वत:चा उद्योग उभारून त्या उद्योगातून इतरांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. तसेच पंचपरिवर्तन हा विषय प्रत्येक व्यक्तीने समजून घेतला पाहिजे. कौशल्य विभागाच्या 'न्यू एज' कोर्सेसच्या माध्यमातून रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, थ्रीडी प्रिंटिंग, इलेक्ट्रिक व्हेईकलसाठी ईव्ही टेक्निशियन, सोलर टेक्निशियन हे कोर्सेस जुलै महिन्यापासून सुरु होत आहेत.

या कोर्सेसद्वारे भविष्यामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नव्याने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी या नवीन अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावा, असेही आवाहन देखील लोढा यांनी केले. मंत्री लोढा यांच्या हस्ते उद्योजक झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

## ८ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी अमरावती येथे

# जागतिक पर्यावरण दिना निमित्त भव्य वृक्षारोपण कार्यक्रम

**शौर्य व शिस्तबद्धता सोबतच एनसीसीच्या कॅडेटनी पर्यावरण पूरक जीवन शैलीचा अंगीकार करावा : आ.सुलभा खोडके**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*अमरावती* – विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शौर्य, शिस्तबद्धता भावना निर्माण करुन जनसेवा व देशसेवेची भावना निर्माण करण्यामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेचे मोठे कार्य आहे.




एनसीसीच्या प्रत्येक शिबिरात होणारे प्रशिक्षण व उपक्रम हे व्यक्तिमत्व विकासासाठी अत्यंत महत्वाचे आहे. परंतु आजच्या आधुनिक व डिजिटल काळात अनेक तांत्रिक संसाधनांच्या वापरामुळे मानवाला पर्यावरणाचा विसर पडत चालला असल्याने त्याचे विपरीत परिणाम वसुंधरेवर उमटू लागले आहे. निसर्गाचा समतोल अबाधित राखण्यासाठी माणसाचे नाते निसर्गाशी जोडणे महत्वाचे आहे. त्यामुळे एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धन घडून आणण्यासाठी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करावा, असे आवाहन अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून व्हीएमव्ही मार्ग स्थित ८ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अमरावतीच्या प्रांगणामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ८ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अमरावतीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल रवींद्र कुमार तर प्रमुख अतिथी म्हणून आ.सुलभा खोडके, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, अमरावतीत ग्रूपचे डेप्युटी ग्रुप कमांडर धर्मवीर सिंह, सहायक जिल्हाधिकारी मिनू पीएम, जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अतुल बोडखे, महर्षी पब्लिक स्कूल अमरावतीचे प्राचार्य डॉ.अबीन राज, ८ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे सुभेदार मेजर सुलेमान शेख, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आ.सुलभा खोडके यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. एनसीसी कॅम्प परिसरात जवळपास दोन हजार वृक्ष लागवड करण्याचा संकल्प असून विविध प्रजातींची वृक्ष लागवड तसेच फळबाग फुलविण्याच्या उद्देशाने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले असल्याची माहिती एनसीसी व्यवस्थापनच्या वतीने देण्यात आली.

या उपक्रमाची आमदार महोदयांनी प्रशंसा केली. अमरावती शहर स्वच्छ , सुंदर व हरित होत असतांना शाळा, महाविद्यालय परिसर तसेच शासकीय कार्यालय व इतर ठिकाणी सुद्धा वृक्षारोपण करणे आवश्यक आहे. यासाठी युवकांनी तसेच विविध सामाजिक संघटनानी वृक्ष लागवडीच्या चळवळीमध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग दर्शवावा,असे आवाहन सुद्धा आ.सुलभा खोडके यांनी केले. यावेळी आमदार महोदयांनी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा प्रदान केल्या.

# वाशिममध्ये पारंपरिक शेती पद्धतीऐवजी आधुनिक तंत्राचा अवलंब, काय आहे ही पद्धत?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*वाशिम* – खरीप हंगाम सुरू झाला असून वाशिम जिल्ह्यातील शेतकरी आता पारंपरिक शेती पद्धतीऐवजी आधुनिक



तंत्रांचा अवलंब करु लागले आहेत. विशेषत: बीबीएफ म्हणजेच रुंद सरी वरंबा पद्धतीने शेतीची पेरणी करण्यावर भर दिला जात आहे. ही पद्धत कमी किंवा जास्त पावसाच्या परिस्थितीत सुद्धा पीक वाचवण्यासाठी उपयुक्त ठरते. मृदसंधारणाला चालना देत ही पद्धत पाण्याचे नियोजन सुलभ करते आणि त्यातून पीक उत्पादनात वाढ होते. त्यामुळे वाशिम जिल्ह्यातील अनेक शेतकरी यंदाच्या खरीप हंगामात बीबीएफ अर्थात रुंद सरी वरंबा या आधुनिक पद्धतीचा अवलंब करुन शेतीच्या तयारीला लागले आहेत. रुंद सरी वरंबा पद्धतीने पेरणी करतांना साधारणत: दोन सरीमध्ये साडे सहा फुटाचे अंतर ठेवून मधील मोकळ्या जागेत पीक घेतले जाते. दोन्ही बाजूने सरी पडल्याने पावसाचे पाणी त्या सरीमध्ये झिरपून पिकांच्या वाढीसाठी हवे तेवढेच पाणी मिळते. त्यामुळे कमी पावसाळी परिस्थितीतही पिकांची चांगली वाढ होते. तसेच जास्त पाण्यातही या पध्दतीने पेरणी केलेल्या शेतातील पिकांना वाहून अथवा जळून जाण्याचा धोका उद्भवत नाही. तसेच मृदसंधारण होण्यास मदत मिळते.

# 'परिवहन महामंडळा'च्या जागांचा 'पीपीपी' पद्धतीने विकास करुन उत्पन्न वाढवा : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध शहरांमध्ये बसस्थानक व बस आगार परिसर स्वरुपात जागा आहेत. अशा जागांचा विकास करुन महामंडळ उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करु शकते. पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) पद्धतीने अशा जागांचा व्यावसायिक स्वरुपात विकास करण्यात यावा. यामधून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यात यावे, अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.

एस.टी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयातील सभागृहात महामंडळाच्या जागांचा व्यावसायिक स्वरूपात विकास करण्यासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीस महामंडळाचे महाव्यवस्थापक (स्थापत्य) दिनेश महाजन, वास्तुविषारद लहीवाल आदी उपस्थित होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, 'एसटी'च्या राज्यातील जागांचा विकास करताना स्थानिक परिस्थिती, व्यावसायिक लाभ आदी बाबी लक्षात घेण्यात याव्यात. या जागांच्या विकासासाठी अ, ब आणि क असे वर्गीकरण करून त्यांचे एक पॅकेज करावे.

ज्यामध्ये शहरी, निमशहरी आणि ग्रामीण जागांचा समावेश असावा. पॅकेजमधील मालमत्तेचे मूल्य त्याच पॅकेजमध्ये असावे. राज्यात ७२ पॅकेजेसमधून एसटी बसस्थानक, आगार आदींचा विकास करण्यात येणार आहे. पॅकेजमध्ये कामांबाबत सुधारणा करायची असल्यास सुधारणा करून घ्याव्यात. या कामाला गती देवून तातडीने या संदर्भातील कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देशही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

# कत्तलीसाठी जात असलेल्या ११ गोवंशाना जीवदान

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

## शेंदुरजनाघाट पोलिसांची पुसली धरणानजीक कारवाही



**शेंदुरजनाघाट** – कत्तलीसाठी जात असलेल्या ११ गोवंशाना जीवदान देण्यात शेंदुरजनाघाट पोलिसांना यश आले असून पोलिसांनी दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला असुन ईदच्या पार्श्वभुमिवर पोलिसांनी केलेल्या या कारवाहीला अधिक महत्व प्राप्त झाले आहे.

पोलीस स्टेशन शेंदुरजनाघाट अंतर्गत येणाऱ्या पुसली धरणाच्या जवळील शेतामध्ये गोवंश जातीच्या जनावरांना कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याची माहीती वरुन ठाणेदार तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक दिपक महाडीक, पोलिस उपनिरिक्षक मंगेश शेगोकार, रविंद्र दातीर, संजय रोतवाल, विरेंद्र अमृतकर, संदीप वानखडे, सागर लेव्हरकर, नितीन ठाकरे, इंद्रजित चौधरी, उमेश कुंभेकर, महेश बारवुधे हे घटनास्थळी रवाना झाले. पुसली धराणाजवळील शेताच्या खाली असलेल्या नाल्यामध्ये कत्तल करण्याच्या उद्देशाने चारापाण्याविना बांधलेल्या अवस्थेत ६ गोवंश जनावरे व दुसऱ्या ठिकाणी बाजुला ५ गोवंश जनावरे असे एकूण ११ गोवंश जातीचे जनावरे किंमत अंदाजे ८९ हजार रुपयांचे मिळुन आले असुन आरोपी रजा उर रहमान शेख नासीर, रा.करजगांव ह.मु.शे.घाट, जुबेर अहमद जमील अहमद रा.शे.घाट यांचे विरुध्द पोलीस स्टेशन शे.घाट येथे कलम ५ (अ),९ म.प्रा.सं. अधिनियम सहकलम ११ (१) (एफ) (एच) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक दिपक महाडीक, पोलिस उपनिरिक्षक मंगेश शेगोकार, रविंद्र दातीर, संजय रोतवाल, विरेंद्र अमृतकर, संदीप वानखडे, सागर लेव्हरकर, नितीन ठाकरे, इंद्रजित चौधरी, उमेश कुंभेकर, महेश बारवुधे यांनी केली.

# झाडाच्या ढोलीतून पाण्याचा 'धबधबा', पुण्यातील उद्यानात चमत्काराच्या चर्चा : अखेर चक्रावून टाकणारं सत्य समोर

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – पिंपरी चिंचवड भागातील प्रेमलोक पार्क परिसरात शुक्रवारी रात्री एक विचित्र दृश्य पाहायला मिळालं होतं. एका झाडाच्या ढोलीतून अचानक पाणी वाहू लागलं. त्यामुळे पाहता पाहता ते झाड 'दैवी चमत्काराचं' केंद्र बनलं. कोणी म्हणालं, 'झाड अश्रू ढाळत आहे', तर कोणी याला चक्क 'अमृतधारा' असं संबोधलं. श्रद्धा-अंधश्रद्धेची घुसळण सुरु असतानाच हा नेमका काय प्रकार आहे, हे स्पष्ट झालं आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला. चिंचवडमधील प्रेमलोक पार्क परिसरात असलेल्या या झाडाच्या भोवती क्षणातच गर्दी जमा झाली. कुणी त्याला हार घातले, तर कुणी हळद-कुंकू वाहू लागलं. कोणी म्हणालं, हे पाणी अंगाला लावल्यामुळे शांतता मिळते. सोशल मीडियावरही या झाडाचे फोटो आणि व्हिडीओ अल्पावधीत व्हायरल झाले. परिसरातील काही सूज्ञ आणि विज्ञानवादी नागरिकांनी हा चमत्कार नसल्याचं समजून घेत शंका उपस्थित केली. याची माहिती तात्काळ अग्निशमन दलाला देण्यात आली.या ठिकाणी काही वर्षांपूर्वी टाकलेली भूमिगत पाईपलाईन फुटली होती. त्याच ठिकाणी उगवलेल्या झाडाच्या खोडातून पाण्याला वाट मोकळी मिळाल्याने झाडातून पाणी वाहू लागलं होतं. 'श्रद्धा ठेवायला हरकत नाही, पण झाडातून पाणी वाहायला लागलं, तर आधी नळ तपासा, देव सापडेल अथवा नाही, पण गळती नक्की सापडेल' अशा शब्दात एका वृद्धाने या साऱ्या प्रकारावर टिपणी केली होती.

राम मंदिरात ४५ किलो सोन्याचा वापर अयोध्येतील राम मंदिराच्या उभारणीसाठी एकूण ४५ किलो शुद्ध सोन्याचा वापर करण्यात आल्याची माहिती राम मंदिर बांधकाम समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी दिली.

मंदिर संकुलाच्या पहिल्या मजल्यावर राम पंचायतनच्या प्राण प्रतिष्ठापना सोहळ्यानंतर दुसऱ्या दिवशी शुक्रवारी मिश्रा यांनी ही माहिती दिली. मंदिरासाठी वापरण्यात आलेल्या सोन्याची किंमत करवगळता ५० कोटी रुपये आहे.

# बोगस बियाण्यांची विक्री करणारा पोलिसांच्या ताब्यात

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

## पिंपळखुटा येथे कृषी विभाग व पोलिसांची संयुक्त कारवाई



**वरुड** - तालुक्यातील पिंपळखुटा येथे शेतकऱ्यांना बोगस बियाण्यांची विक्री करीत असलेल्यला कृषी विभागाने रंगेहात पकडले असून त्याला बेनोडा (शहीद) पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, गुरुवार ५ जून रोजी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राहूल सातपुते यांचे मार्गदर्शनाखाली तालुक्यातील बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन हद्दीत येत असलेल्या पिंपळखुटा परिसरात सापळा रचण्यात आला होता. शेतकऱ्यांना बोगस बियाण्यांची विक्री करणारा अजिंक्य पडोळे याला प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्यांसह रंगेहात पकडण्यात आले. अजिंक्य पडोळे हा संशयित प्रतिबंधित कपाशी बियाण्यांची शेतकऱ्यांना विक्री करीत होता.

याबाबत गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्याची कृषी विभागाकडून शहानिशा करण्यात आली. त्यानंतर बेनोडा (शहीद) पोलिसांच्या मदतीने त्याच्याविरुद्ध सापळा रचण्यात आला. यावेळी कृषी विभागाकडून एक डमी ग्राहक त्याच्याकडे बियाण्यांची खरेदी करण्यासाठी पाठविण्यात आला. त्या ग्राहकाला कपाशीचे बोगस बियाणे देत असतांना त्याला कृषी विभागाकडून अटक करण्यात आली. झाडाझडतीमध्ये त्याच्याजवळून संशयित बियाण्यांची एकूण ४५ पाकिटे जप्त करण्यात आली. याप्रकरणी बियाणे निरिक्षक तथा पंचायत समिती कृषि अधिकारी राजकुमार सावळे (३९) रा.वरुड यांचे फिर्यादीवरुन बेनोडा (शहीद) पोलिसांनी अजिंक्य धनराज पडोळे (२५) रा.पिंपळखुटा याच्याविरुद्ध कलम ३१८ (४), ३३६ (४), ३४० (२), बी.एन.एस.सहकलम बियाणे नियम १९६८ नियम ७ व ८ बियाणे नियंत्रण आदेश १९८३ खंड ३ , ९ बियाणे अधिनियम १९६६ क ७ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८३ कलम १५ महाराष्ट्र कापूस बियाणे २००९ कलम १२ (९) पुस बियाणे किंमत नियंत्रण आदेश २०१५ (५) अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ कलम ३, ७, ९ वनज मापे पॅकेज केलेल्या वस्तु नियम १९७७ कलम ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई मोर्शीचे उपविभागीय कृषि अधिकारी उज्वल आगरकर, तालुका कृषी अधिकारी रेहान मुजावर, पंचायत समिती कृषी अधिकारी राजकुमार सावळे यांच्या पथकाने केली आहे.

# लहानपणीचे जीवलग, पण एकतर्फी प्रेमाने घात केला

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**कोल्हापूर** – एकतर्फी प्रेमात अडसर बनणाऱ्या मित्राला दगडाच्या खणीत ढकलून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

ही घटना बुधवार ३ जून रोजी केर्ले हनुमान नगर येथे घडली होती. महेंद्र प्रशांत कुंभार, वय वर्ष अठरा असं हत्या झालेल्या मुलाचं नाव आहे, सुरुवातीला हा अपघात असल्याचं निदर्शनास आलं होतं, मात्र पोलिसांच्या तपासादरम्यान हा घातपात असल्याचा संशय पोलिसांना आला आणि त्यानुसार तपास केल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, करवीर तालुक्यातील पोर्ले तर्फे ठाणे येथील केर्ले गावात महेंद्र आणि अल्पवयीन संशयित आरोपी हे दोघं लहानपणीपासूनचे जिवलग मित्र होते.

महेंद्रचं गावातीलच एका मुलीसोबत प्रेम संबंध होते. मात्र त्याच मुलीवर संशयित आरोपीचं देखील एकतर्फी प्रेम होत. महेंद्र आणि मुलगी एकमेकांशी बोलतात, भेटतात आणि फिरत असल्याचा राग संशयित आरोपीच्या मनात होता. यावरुनच दोन्ही मित्रांमध्ये फेब्रुवारी महिन्यात जोरदार भांडण देखील झालं होतं.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, करवीर तालुक्यातील पोर्ले तर्फे ठाणे येथील केर्ले गावात महेंद्र आणि अल्पवयीन संशयित आरोपी हे दोघं लहानपणीपासूनचे जिवलग मित्र होते.

महेंद्रचं गावातीलच एका मुलीसोबत प्रेम संबंध होते. मात्र त्याच मुलीवर संशयित आरोपीचं देखील एकतर्फी प्रेम होत. महेंद्र आणि मुलगी एकमेकांशी बोलतात, भेटतात आणि फिरत असल्याचा राग संशयित आरोपीच्या मनात होता. यावरुनच दोन्ही मित्रांमध्ये फेब्रुवारी महिन्यात जोरदार भांडण देखील झालं होतं.

# उसने घेतलेल्या पैशांवरुन वाद, रिक्षा चालकाने महिलेला संपवलं

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)




**पुणे** – पुण्यात हत्या, मारामारी, धमकी अशा गुन्ह्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. असाच एक हत्येचा धक्कादायक प्रकार पुन्हा एकदा पुण्यात समोर आला आहे. धायरी परिसरात असणाऱ्या रायकर मळा येथे हात उसने दिलेल्या पैशांवरुन मोठा वाद झाला होता. याच झालेल्या वादातून एका रिक्षा चालकाने एका महिलेचा गळा आवळून खून केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेन पुण्यात एकच खळबळ उडाली आहे. श्यामली कमलेश सरकार (वय ४०, रा.सूर्यउज्ज्वल हाईट्स, रायकर मळा, धायरी, सिंहगड रस्ता) असं हत्या झालेल्या महिलेचं नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी नितीन चंद्रकांत पंडित याला अटक केली आहे.

याबाबत सिंहगड पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, श्यामली सरकार आणि नितीन पंडित यांची जुनी ओळख होती. श्यामली ही कामानिमित्ताने शहरात नितीनच्या रिक्षाने येत होती. त्यामुळे दोघांची ओळख झाली होती. यादरम्यान श्यामली हिला पैशांची चणचण निर्माण झाली होती. त्यामुळे तिने रिक्षा चालक नितीन याच्याकडून हात उसने पैसे घेतले होते. ते तिने अनेक दिवस परत केले नाहीत. त्यानंतर नितीनने तिच्याकडून वेळोवेळी पैसे मागण्याचा प्रयत्न केला. मात्र ती कारणं देत होती. या पैशांच्या वादातून दोघांमध्ये बुधवारी जोरदार भांडण झालं. रायकर मळा येथे दोघांमध्येची पैसे मागण्यावरून जोरात वाद झाले. त्याच रागातून नितीन पंडितने श्यामली हिचा तिच्याच ओढणीने गळा आवळून खून केला. श्यामलीला आपण रागाच्या भरात संपवल्याचं नितीनच्या लक्षात आलं.

# झुडपात कार, कारमध्ये कुजलेले ३ मृतदेह : कसारा घाटात भयंकर प्रकार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***कसारा*** – गेल्या काही दिवसांपासून राज्यात खून, मारामाऱ्या तसेच अपघातांच्या भयंकर घटना समोर येत आहेत.

शहापूर तालुक्यातील कसारा घाटामध्ये अशीच एक हादरवुन टाकणारी घटना उघडकीस आली आहे. घाटामध्ये एका झुडपात पडलेल्या गाडीत ३ तरुणांचे मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. या तरुणांचा अपघात की घातपात? याबाबतचा तपास आता सुरु आहे. याबाबत समोर आलेल्या माहितीनुसार, शहापूर तालुक्यातील कसारा घाटामध्ये एका बंद कारमध्ये कुजलेल्या अवस्थेत तीन तरुणांचे मृतदेह आढळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मुंबई नाशिक महामार्गावर रोडच्या कडेला झाडाझुडपात एका नाल्याजवळ ही कार कोसळली होती. गुरे चारण्यासाठी गेलेल्या महिलेमुळे हा प्रकार उघडकीस आला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांसह बचावपथकाने धाव घेतली.




# देशातील सर्वात उंच केबल ब्रिजवर प्रवासासाठी प्रतीक्षाच

## मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील 'मिसिंग लिंक' कधी सुरु होणार?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील बहुप्रतिक्षित 'मिसिंग लिंक' प्रकल्पातील बोगद्याचे (टनेल) काम पूर्ण झाले आहे.

मात्र वाहनचालकांना या मार्गावरुन प्रवास करण्यासाठी अजून किमान पाच महिने वाट बघावी लागणार आहे, कारण टायगर व्हॅली भागातील केबल-स्टे ब्रिजचे (दोऱ्यांनी समर्थित पूल) काम अद्याप सुरु आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून मिसिंग लिंक प्रकल्प ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण होणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र या प्रकल्पाना अपेक्षेपेक्षा जास्त महिन्यांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. प्रशासनाने या विलंबासाठी जोरदार पाऊस आणि तीव्र वारे ही कारणं सांगितली आहेत. 'मिसिंग लिंक' प्रकल्पात एकूण १३ किलोमीटर लांबीचा बोगदा आहे, जो आता बांधून पूर्ण झाला आहे. मात्र या बोगद्याला जोडणारा आणि टायगर व्हॅलीवर बांधला जाणारा पूल अद्यापही अपूर्ण आहे. या पुलाचा सूपर-स्ट्रक्चर (म्हणजे प्राथमिक बांधकाम) पूर्ण झाले असले तरी, केबल्स बसवण्याचे काम प्रलंबित आहे. हा पूल जमिनीपासून सुमारे १३२ फूट उंचीवर उभारला जात आहे. हवामानातील अडथळ्यांमुळे – विशेषतः खोऱ्यातील जोरदार वारे आणि मुसळधार पावसामुळे कामगारांना कामामध्ये मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# एकनाथ शिंदेंचे विमान उडवण्यास पायलटचा नकार

## ४५ मिनिटे हायहोल्टेज ड्रामा : जळगावमध्ये काय घडलं?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***जळगाव*** – जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या दौऱ्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. जळगावचा दौरा आटोपून मुंबईकडे परतणाऱ्या एकनाथ शिंदेंना विमानाच्या वैमानिकाने उड्डाण घेण्यास नकार दिल्याने उपमुख्यमंत्र्यांची चांगलीच पंचाईत झाली. वैमानिकांच्या ड्युटीची वेळ संपल्याने त्यांनी उड्डाण घेण्यास नकार दिला ज्यामुळे हा सगळा प्रकार घडला.

अखेर गिरीश महाजन आणि गुलाबराव पाटील यांच्या मध्यस्थीने हा घोळ मिटला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या जळगाव जिल्हा दौऱ्यावर होते.



आषाढी वारीनिमित्त संत मुक्ताईचा पालखी सोहळा आज पंढरपूर कडे प्रस्थान झाल्याने या पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मक्ताईनगर येथे आले होते. एकनाथ शिंदे यांची जळगाव विमानतळावर ३.४५ येण्याची नियोजित वेळ होती मात्र तब्बल अडीच तास उशिरा ६.१५ वाजता एकनाथ शिंदे हे जळगाव विमानतळावर पोहोचले त्यामुळे जळगाव ते मुक्ताईनगर असा वाहनाने प्रवास करत मुक्ताईच्या पालखी सोहळ्यात सहभाग घेऊन संत मुक्ताई च्या मंदिरात येतना शिंदे यांनी दर्शन घेतले. मात्र नियोजित वेळेपेक्षा उशिरा आलेल्या एकता शिंदे यांना मुक्ताईनगर वरुन जळगाव विमानतळावरती येण्यासाठी विलंब झाला त्यामुळे ९.१५ मी मुक्ताईनगरवरुन जळगाव विमानतळावर पोहोचले. मात्र टाईम झाल्यामुळे विमानाच्या वैमानिकांनी विमानाच्या उड्डाण भरण्यास नकार दिल्याने विमान प्राधिकरण व प्रशासनाची एकच तारांबळ उडाली. दरम्यान मंत्री गिरीश महाजन गुलाबराव पाटील तसेच जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी वैमानिकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला मात्र वैमानिक आपल्या निर्णयावर ठाम होते. अखेर वैमानिकांसोबत बंदद्वार चर्चा करुन ४५ मी नंतर वैमानिकांनी विमानाच्या उड्डाणाला होकार दिला. मात्र त्यामुळे एकनाथ शिंदेंना जळगाव विमानतळावर ४५ मिनिटं प्रतीक्षा करावी लागली. मात्र याच विलंबाची एका किडनीने त्रस्त असलेल्या महिला रुग्णाला मदत झाली असून किडनी ट्रान्सपरंट करण्यासाठी मुंबईकडे निघालेल्या महिला रुग्णाला तात्काळ मुंबई त पोहोचायचे होते मात्र मुंबईकडे जाणारे विमान हे विमान तळावर पोहोचण्याआधीच निघून गेल्याने वेळेत मुंबईच्या रुग्णालयात पोहोचणे अशक्य होते. पण एकनाथ शिंदे यांचा विमान मुंबईकडे जाणार असल्याने याबाबत गिरीश महाजन यांना माहिती मिळाली व गिरीश महाजन यांनी महिला रुग्णासह तिच्या पतीला एकनाथ शिंदे यांच्या विमानाद्वारे मुंबईला सोडण्याची विनंती करण्यात आली.

# महिलेची २५ लाख रुपयांनी ऑनलाईन फसवणुक

## बेनोडा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***वरुड*** – जास्त रिफंड मिळेल, असे म्हणुन वेळोवेळी पैसे भरण्याकरीता सांगुन तालुक्यातील बेनोडा येथील महिलेची २५ लाख रुपयांनी ऑनलाईन फसवणुक करण्यात आली आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी वैष्णवी प्रतिक फरकाडे (२६), रा.चांदणी चौक, बेनोडा यांना न्यु झिलॅन्ड गोल्ड मर्चंटस् मध्ये जसमीत सिंग नावाचे इसमाचे त्याचे व्हॉटसअप क्र.८५३८९०२४३४ याने फिर्यादी वैष्णवीचे मोबाईल हॉटसअप क्रमांकावर लिंक पाठवुन लिंकव्दारे फिर्यादीचे वैष्णवी गावेर्धन सोनार या नावाचे खाते उघडून करुन फायनान्स ॲडव्हाईजर व्हॉटस्ॲप क्र.८५३८९०२४३४ यावरुन कॉल, मॅसेज करुन फिर्यादी वैष्णवीला जास्त रिफंड मिळेल, असे म्हणुन वेळोवेळी पैसे भरण्याकरीता सांगुन फिर्यादी वैष्णवीने फोन, गुगलपे, ब्क्ड मशीनव्दारे एकुण २५ लाख ५३ हजार ४३८ रुपये जमा केले परंतु सदरची रक्कम परत काढणेकरीता पुन्हा रक्कम भरण्याकरीता सांगुन फिर्यादी वैष्णवीची ऑनलाईन आर्थिक फसवणुक केली. या प्रकरणी फिर्यादी वैष्णवी प्रतिक फरकाडे (२६), रा.चांदणी चौक, बेनोडा यांच्या फिर्यादीवरुन बेनोडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भादंवि ३१८ (२), ३१८ (४), बी.एन.एस. सहकलम ६६ (सी) ६ (डी) माहिती तंत्रज्ञान अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शखाली बेनोडा (शहीद) पोलिस करीत आहे.

# मुस्लीम बांधवांच्या नमाजावेळी शिवसेनेचा घंटानाद!

## दुर्गाडीवर ४० वर्षांपासून का होते आंदोलन? वाचा इतिहास

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***विशालगड*** – देशभरात आज बकरी ईदचा सण मोठ्या उत्साहात पार पडत आहे. ईद हा मुस्लीम बांधवांचा दुसऱ्या क्रमांकाचा पवित्र सण समजला जातो.

बकरी ईदनिमित्त मुस्लीम बांधवांनी धार्मिक स्थळांमध्ये गर्दी केली आहे. एकीकडे ईदचा सण मोठ्या उत्साहात पार पडत असतानाच कल्याणमध्ये वादाची



ठिणगी पडली आहे. याचे कारण म्हणजे दरवर्षी प्रमाणे शिवसेनेकडून कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यासमोर घंटानाद आंदोलन केले जात आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, बकरी ईद निमित्त शिवसेना शिंदे गटाचे दुर्गाडी किल्ल्याच्या पायथ्याशी घंटानाद आंदोलन सुरु आहे. या आंदोलनात मोठ्या प्रमाणात शिवसैनिक सहभागी झाले असून लाल चौकी परिसरात पोलिसांनी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना अडवले.

यावेळी शिवसेना कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. जोपर्यंत मंदिर सुरू होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार. पोलीस एका धर्माला नाही तर दुसरा धर्मावर अन्याय करतात.




